International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# बहुसांस्कृतिकतावाद: मानवी समाजाची कालातीत गरज

**प्रा. ए. बी. मोहिते**

*सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग*

*म.ह. शिंदे महाविद्यालय तिसंगी, ता. गगनबावडा, जि.कोल्हापूर.*

***Corresponding Author - प्रा. ए. बी. मोहिते***

**DOI - 10.5281/zenodo.10937632**

**गोषवारा:**

*आधुनिक काळात जगातील बहुसंख्य देशातील समाज रचना ही बहुसांस्कृतिक स्वरूपाची आहे. भारतीय समाज ही प्राचीन काळापासून बहुसांस्कृतिक स्वरूपाचा आहे. त्यामुळे "बहुसांस्कृतिकता" या संकल्पनेच्या अभ्यासाला महत्त्व प्राप्त झाले आहे. आज जगातील अनेक देशात अल्पसंख्यांक समुदायांना त्यांची संस्कृती, भाषा,धर्म, वंश, परंपरा, अस्मिता यांच्यासह कसे सामावून घ्यावे हा जटिल प्रश्न निर्माण झाला आहे. याबरोबरच विविध कारणांमुळे होणारे स्थलांतर, विस्थापित, आदिवासी,निर्वासित यांचे प्रस्थापित बहुसंख्यांक समाजामध्ये कशाप्रकारे समायोजन करावे यासंबंधीचे प्रश्न राज्यसंस्थेसमोर निर्माण झाले आहेत. आधुनिक काळात जगातील बहुतेक देशांचे स्वरूप हे एकजिनसी राहिलेले नाहीत. उदारमतवादी राजकीय व्यवस्था असलेल्या देशांमध्ये व्यक्तीच्या स्वातंत्र्याला, विवेकाला, स्वायत्ततेला, अधिकारांना महत्त्व देण्यात आले आहे. या व्यवस्थांनी धर्मनिरपेक्ष, इहवादी विचारांचा पुरस्कार केला आहे. परंतु हा विचार केवळ राजकीय दृष्टिकोनातून करण्यात आला आहे. वस्तुतः व्यक्ती ज्या सांस्कृतिक समूहाचा घटक असते त्या समूहाची संस्कृती,परंपरा, अस्मिता, लिपी व भाषा,ऐतिहासिक घटना, राजकीय व्यवस्था, आर्थिक रचना, सामाजिक रचना याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. भिन्न सांस्कृतिक ओळख असणाऱ्या समुदायांचे समावेशन करून त्यांच्याशी कसा व्यवहार करावा या प्रश्नाची मांडणी राजकीय विचारवंतांनी केली आहे. त्याची चर्चा प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात आली आहे.*

**प्रास्ताविक:**

राज्यशास्त्राच्या अभ्यासकांमध्ये राजकीय संस्कृतीमधील बहुसंस्कृतीवाद ही संकल्पना गांभीर्याने अभ्यासली जात आहे. भारतासह जगातील अनेक देशात विविध वंशांचे व धर्मांचे लोक स्वतःची वेगळी ओळख टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. युद्ध, अंतर्गत यादवी, नैसर्गिक आपत्ती, राजकीय दडपशाही, वंशिक हिंसाचार, व्यवसाय, रोजगार इत्यादी कारणांमुळे जगाच्या पाठीवर माणसांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर व विस्थापन होत आहे. जागतिकीकरणानंतर आणि धार्मिक मूलतत्त्ववादी व वंशश्रेष्ठत्ववादी राजवटींमुळे मानवी स्थलांतरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या लोकांचे प्रस्थापित एकजीनशी

समाजात समावेशन कसे करावे? भिन्न सांस्कृतिक ओळख असणाऱ्या लोकांना नागरिकत्वाचे अधिकार देण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. भिन्न वांशिक, भाषिक, धार्मिक ओळख असणाऱ्या लोकांना समाविष्ट करून घेण्यास प्रस्थापित समाज तयार होत नाही. अशावेळी हे प्रश्न शांततेने कसे हाताळावे, याचे आव्हान राज्यसंस्थांसमोर असल्याचे दिसून येते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

बहुसंस्कृतिकतावादाची संकल्पना अभ्यासण्याचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

1) बहुसांस्कृतिक समाजाची संकल्पना समजावून घेणे.
2) बहुसंस्कृतीवादाविषयीचे विचार अभ्यासणे.
3) बहुसांस्कृतिक समाजात अल्पसंख्य समाजाच्या समायोजनाचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहितके:**

प्रस्तुत शोधनिबंधाची गृहितके पुढील प्रमाणे आहेत.

1) जगातील मानवी समुदाय हे बहुसांस्कृतिक स्वरूपाचे आहेत.
2) मानवी समाजात न्याय आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी बहुसांस्कृतिकतावादाची संकल्पना उपयुक्त आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**बहुसांस्कृतिकतावाद:अर्थ आणि स्वरूप**

बहुसांस्कृतिकतावादाचा दृष्टिकोन हा 1980 पासून विकसित झालेला आहे. बहुसंस्कृतिकतावाद म्हणजे एखाद्या देशात किंवा समाजात एकच संस्कृती असण्या ऐवजी अनेक संस्कृती अस्तित्वात असणे होय. समाजात प्रत्येक समूहाची स्वतंत्र ओळख असते. त्याबरोबरच या लोकसमुदायांची समान ओळख ही असते. समाजात अल्पसंख्या समुदायाची ओळख कायम राखण्यासाठी बहुसंख्यांक समुदायाने व्यापक सहिष्णु दृष्टिकोन स्वीकारावा अशी अपेक्षा केली जाते. बहुसंख्यांकांनी आपले हितसंबंध लहान किंवा अल्पसंख्या गटांवर लादण्याचा प्रयत्न करू नये. त्यांना दुय्यम दर्जाची वागणूक देऊ नये.समाजातील विविध सांस्कृतिक समुदायातील नागरिकांना सामावून घेणे हे खऱ्या समतेचे व न्यायाचे वैशिष्ट्य आहे. थोडक्यात विविध लोकसमुदायांना समान संधी व स्वातंत्र्य उपलब्ध करून देऊन प्रादेशिक स्वायत्तता, प्रतिनिधित्व,भाषा व लिपी इत्यादी हक्क प्रदान केले तर त्यांच्या समायोजनाचा प्रश्न सोडविणे सुलभ होईल.

बहुसंस्कृतिकतावादामध्ये एखाद्या समाजात विविध संस्कृतींचे सहअस्तित्व व सहजीवन स्वीकारले जाते किंवा मान्य केले जाते.

राज्यघटना व कायद्याच्या चौकटीत किंवा मर्यादित प्रमाणात विविध अल्पसंख्य सांस्कृतिक गटांना त्यांच्या सांस्कृतिक प्रथा, परंपरांचे आचरण आणि पालन करण्याची मुभा देउन.समायोजन करण्याचा प्रयत्न केला जातो.

**बहुसांस्कृतिकतावादाच्या उदयाची कारणे:**

सामान्यतः पुढील चार कारणांनी बहुसंस्कृतीवाद उदयास आला आहे.

१) प्रत्येक समाजात वेगवेगळा विचार व संस्कृतीचा पुरस्कार करणारे गट असतात. तसेच एकाच धर्मात अनेक पंथ, संप्रदाय व जाती किंवा वर्ग असतात. उदाहरणार्थ भारतात हिंदू धर्मात विविध संप्रदाय व जाती व्यवस्था अस्तित्वात असलेली दिसून येते.

२) युद्ध, यादवी, अन्यायी राजवटी,पूर,दुष्काळ, साथीचे रोग, सरकारी आदेश,व्यवसाय, नोकरी इत्यादी कारणांमुळे लोक स्थलांतर करतात. गुलामगिरीच्या कालखंडात गुलामांचे स्थलांतर एका देशातून दुसऱ्या देशात होत असे. साम्राज्यवादी राज्यकर्त्यांनी दुसऱ्या देशात आपल्या वसाहती स्थापन केल्या आहेत.

३) समाजात धार्मिक, जातीय, भाषिक व वांशिक, प्रादेशिक अल्पसंख्य समाज गट असतात. त्यांना स्वतःची वेगळी ओळख किंवा अस्मिता प्रिय असते. असे समुदाय चिवटपणे आपल्या रूढी व परंपरांचे पालन करतात.

४) समाजात स्त्रिया, मुले, अपंग, वृद्ध, तृतीयपंथी, आदिवासी, भटक्या जाती-जमाती यांच्या अधिकारांबाबत जागृती निर्माण होत असून त्यांना समतेची,स्वातंत्र्याची, न्यायाची व सन्मानाने जगण्याची आकांक्षा निर्माण झाली आहे.

त्यामुळे वरून एकजिनसी दिसणारे समाज देखील मूलतः बहुसांस्कृतिक असल्याचे दिसून येते. समाजात न्याय,स्वातंत्र्य,समता, बंधुता, सहिष्णुता, परस्परांचा आदर, यांच्या आधारे विविध समाज घटकांच्या बरोबरीने अधिकार देऊन ते उपभोगण्याची संधी देणे महत्त्वाचे असते. बहुसंस्कृतिकतावाद अशा बहुविध, बहुजिनशी समाजाला खरा लोकशाहीवादी आणि स्वतंत्र समाज असल्याचे मानतो.

**विल कॅमिल्का यांचे बहुसंस्कृतीवादाविषयी विचार:**

विल कॅमिल्का, यांच्या मते आधुनिक कालखंडात विविध देशांमध्ये दोन प्रकारचे राजकारण केले जात आहे.

१) **पुनर्वितरणाचे राजकारण:**

पुनर्वितरणाचे राजकारण हे समाजातील अन्याय व विषमता दूर करण्याचे राजकारण असून या राजकारणाचा पुरस्कार साम्यवादी उदारमतवादी कल्याणकारी राज्याचे पुरस्कर्ते करतात. त्यांच्या मते समाजातील उत्पादन साधनांची विषम वाटणी झाल्यामुळे दुर्बल व कमकुवत घटकांचे शोषण होते. त्यामुळे आर्थिक व्यवहारात राज्याने हस्तक्षेप करून सकारात्मक भूमिका घ्यावी. संपत्तीच्या फेर वाटपाची धोरणे अमलात आणावी. त्यासाठी शासन संपत्तीच्या फेर वाटपाची धोरणे राबवण्याचा प्रयत्न करते. या धोरणांमुळे आर्थिक विषमता कमी होते

पण राजकीय, सामाजिक विषमता कायम राहते. कम्युनिस्ट राजवटीत अशी धोरणे राबविली जातात.

२) **मान्यतेचे राजकारण:**

दुसऱ्या प्रकारचे राजकारण मान्यतेचे असते. समाजातील वंचित व शोषित घटकांना बरोबरीचा दर्जा आणि मान्यता हवी असते. समाजात काही वर्ग परंपरेने अधिक मान्यताप्राप्त व प्रतिष्ठित झालेले असतात. युरोप अमेरिकेतील गोऱ्या लोकांना ही मान्यता जन्मानेच सहजपणे मिळते. भारतातही उच्चवर्णीयांना व उच्च जातीतील लोकांना अशी मान्यता व प्रतिष्ठा मिळालेली दिसून येते. पण समाजातील अल्पसंख्याक गट आफ्रिकेतील काळे लोक भारतातील दलित समुदाय, स्त्रिया, अपंग, आदिवासी, तृतीयपंथी, भटके, विमुक्त यांना समाजात मान्यता नसते. मान्यता मिळविण्यासाठी त्यांना सतत रस्त्यावरचा संघर्ष करावा लागतो. त्यांचे वेगळेपण हेच त्यांच्या अस्तित्वाचा, अस्मितेच्या ओळखीचा भाग असतो. आपले वेगळेपण समाजाने मान्य करावे व आपल्याला सन्मानाची वागणूक द्यावी अशी त्यांची इच्छा असते. त्यांना यासाठी जो संघर्ष करावा लागतो त्याला मान्यतेचे राजकारण असे म्हणतात. भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित वंचित सुशिक्षितांच्या हक्कांसाठी संघर्ष केलेला दिसून येतो. अमेरिकेत मार्टिन ल्युथर किंग यांनी निघून जा हक्कांसाठी संघर्ष केलेला दिसतो.

बहुविध समाजातील विविध लोकसमुदायांना किंवा गटांना आपला वेगळेपणा दाखविणाऱ्या प्रथा व परंपरांच्या आचरणाचे पालन करावयाचे असते. फ्रान्स व ब्रिटनमध्ये मुस्लिम स्त्रियांना हिजाब वापरावयाचा आहे. कॅनडातील शिखांना डोक्याला पगडी बांधायची असते. केस व दाढी वाढवायची असते. म्हणजे प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे वागण्याची मुभा असावी असे वाटते. तसेच हिंदूंना आरती करण्याची व विविध उत्सव साजरे करावयाचे असतात. धर्मनिरपेक्ष राजकीय व्यवस्थेत अशा आचरणाला मुभा दिली जाते. राज्याने त्याला विरोध करू नये असे बहुसंस्कृतीवादाच्या समर्थकांचे मत आहे.

**बहुसांस्कृतिक देशातील अल्पसंख्य लोकांपुढील पर्याय:**

जगातील बहुतेक देशात बहुसांस्कृतिक समाज अस्तित्वात आहे. अशा देशातील अल्पसंख्य लोकांपुढे पाच पर्याय उपलब्ध असतात.

१) **स्वयंनिर्णयाचा अधिकार:**

एखाद्या धार्मिक किंवा सांस्कृतिक गटाची वस्ती अनेक वर्षांपासून एकाच भूप्रदेशावर असेल तर असा समुदाय स्वयंनिर्णयाच्या अधिकाराची मागणी करून स्वतःचे राष्ट्र निर्माण करू शकतात.उदा. भारतातील मुस्लिमांनी धर्माच्या आधारे पाकिस्तानची स्थापना केली. त्यानंतर भाषा, संस्कृती व राजकीय दडपशाहीच्या कारणांमुळे बांगलादेश 1971 मध्ये स्वतंत्र झाला. बाल्टिक राष्ट्रे रशियापासून 1991 मध्ये स्वतंत्र झाली. तिमोर इंडोनेशिया पासून स्वतंत्र झाले. सिंगापूर मलेशिया पासून अलग झाले आहे. याउलट समान सांस्कृतिक

ओळख असणारा पूर्व व पश्चिम जर्मनी १९८९ मध्ये एकत्र आला आहे.

**२) स्थलांतर करणे:**

आपल्या धर्माचे किंवा आपली भाषा बोलणाऱ्या राष्ट्रात स्थलांतर केले जाते. उदाहरणार्थ भारताच्या फाळणीनंतर हिंदू व मुस्लिम यांनी दोन्ही देशात स्थलांतर केले. पाकिस्तान मधील सर्व शीख पंजाब मध्ये म्हणजेच भारतात आले. ईस्राइलच्या निर्मितीनंतर जगातील यहुदी किंवा ज्यू धर्मीय लोक ईस्राइल मध्ये आले. परंतु सर्वच लोक स्थलांतर करत नाहीत. काही लोक आहे त्याच ठिकाणी राहतात व ते अल्पसंख्य होतात; व आपली संस्कृती जोपासण्याचा प्रयत्न करतात.

३) **घटनात्मक संरक्षण:**

अल्पसंख्यांक आपले सांस्कृतिक अधिकार कायम ठेवण्यासाठी सरकारशी वाटाघाटी करतात. आणि राज्यघटनेच्या माध्यमातून कायदेशीर संरक्षण प्राप्त करतात. उदा. भारत, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी इत्यादी.

४) **स्वायत्तता:**

अल्पसंख्यांक गट सरकारकडून काही मर्यादित प्रमाणात स्वायत्त यंत्रणा उभी करतात व आपली लिपी, भाषा, धर्म, संस्कृती, अर्थकारण, शिक्षण यांचे संरक्षण करतात. भारतात जम्मू-काश्मीर साठी कलम 370 ची तरतूद करण्यात आली होती. तसेच नागालँड मिझोराम, महाराष्ट्र इत्यादी राज्यांसाठी संविधानात कलम 371 द्वारे विशेष तरतुदी केलेल्या आहेत. सध्या मणिपूर मध्ये सुरू असलेला कुकी आणि मैतेई यांच्यातील संघर्ष हा धार्मिक व सांस्कृतिक संघर्ष असल्याचे दिसून येते.

५) **दुय्यम स्थान पत्करणे:**

काही आदिम जनजाती बहुसंख्य समाजाशी एकात्म न होता दुय्यम स्थान पत्करून आपली भाषा व संस्कृतीचे रक्षण करण्याचे प्रयत्न करतात. ते प्रस्थापित समाजाशी जुळवून न घेता स्वतःचे वेगळे अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न करतात.

जगातील विविध देशातील अल्पसंख्यांक समुदाय वरील पाच प्रकारांनी आपले वेगळेपण किंवा अस्मिता जपण्याचा प्रयत्न करतात. जर त्यांची मुस्कटदाबी होत असेल तर अल्पसंख्यांक गट हिंसेचा शस्त्राचा आधार घेतात. उदा.श्रीलंकेतील तामिळींनी सिंहली बहुसंख्यांक वादाविरोधी हिंसक आंदोलन उभारले होते. म्यानमार मध्ये बहुसंख्यांक बौद्धांच्या हिंसक जमातवादाने चार टक्के रोहिंग्या मुस्लिमांचा वंश संहार सुरू केला आहे.

**सांस्कृतिक राष्ट्रवाद की बहुसंस्कृतिकतावाद:**

आज जगातील विविध देशात राष्ट्रवादाचे वेगवेगळे अविष्कार पाहायला मिळतात. धर्म आणि वंशवादी राष्ट्रवादाचा आग्रह वाढताना दिसत आहे. त्यामुळे समाजातील प्रबळ, शक्तिशाली, बहुसंख्य समाजाचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रात प्राबल्य वाढलेले दिसून येते. भारतात अनेक राज्यांमध्ये प्रगत आणि मागास जातींमध्ये आरक्षणासाठी संघर्ष सुरू असलेला दिसून येतो.

कश्मीर खोऱ्यामध्ये बहुसंख्या मुस्लिम समाजाने अल्पसंख्य हिंदू समाजाला दहशतीच्या मार्गाने विस्थापित करण्यास भाग पाडले आहे. मणिपूरमध्ये मैतेयी आणि कुकी समाजात वांशिक व धार्मिक संघर्ष सुरू आहे.

परंतु बहुसांस्कृतिकतावाद असे मानतो की,केवळ बहुसंख्येच्या जोरावर दलित, आदिवासी, धार्मिक अल्पसंख्य समाजावर अन्याय करणे अयोग्य आहे. उदारमतवादी लोकशाही व्यवस्थांमध्ये वंचित व अल्पसंख्य समुदायांना घटनात्मक तरतुदींद्वारे समतेची व न्यायाची वागणूक देऊन त्यांना मुख्य प्रवाहात सहभागी केले जाऊ शकते. समाजातील दलित, शोषित,अल्पसंख्यांक,स्थलांतरित, निर्वासित समाज घटकांना भाषिक शैक्षणिक सांस्कृतिक स्वातंत्र्य देऊन मानवतावादी दृष्टी ठेवून त्यांचा विकास साधण्याचे प्रयत्न झाले तरच त्यांच्या असंतोषाचे प्रश्न सुटू शकतील. म्हणूनच भारतात पंडित जवाहरलाल नेहरूंनी दूरदृष्टीने धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. समाजातील सर्व समुदायांना समान हक्क देऊन त्यांना न्यायाची वागणूक मिळाली तर राष्ट्रीय ऐक्य वाढीस लागेल.असंतोषाची भावना दूर होऊन राष्ट्रीय भावना प्रबळ होईल.

**निष्कर्ष:**

आज जगातील अनेक भागात अल्पसंख्य समुदायांचे आपल्या अधिकारांसाठी, अस्मितेसाठी, संस्कृती जपण्यासाठी संघर्ष सुरू आहेत. त्यामुळे अल्पसंख्य, वंचित, आदिवासी समुदायांना घटनात्मक तरतुदींद्वारे त्यांच्या धार्मिक परंपरा, भाषा, संस्कृती यांचे जतन करून त्या समुदायांना सत्तेमध्ये सहभागी करून घेणे गरजेचे आहे.तसेच भारतासारख्या संघराज्य व्यवस्थेत काही प्रमाणात स्वायत्तता देऊन अशा समुदायांना मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणता येऊ शकते. समाजातील विविध घटकांच्या मध्ये अधिकारांचे व हक्कांचे वितरण करून न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजातील अल्पसंख्य, स्त्रिया, अपंग, स्थलांतरित, निर्वासित, दलित, आदिम जनजाती, विस्थापित यांना इतर बहुसंख्य समाजाबरोबर समान हक्क देऊन न्यायाची, मानवतेची वागणूक दिल्यास राष्ट्रीय एकता निर्माण होऊन राष्ट्रवादाची भावना प्रबळ होईल. प्रत्येक देशातील वंचित, अल्पसंख्य, आदिवासी, महिला यांना कशा प्रकारची वागणूक दिली जाते यावरच आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाला पत व प्रतिष्ठा प्राप्त होत असते. देशाच्या आर्थिक प्रगती बरोबरच देशांतर्गत धोरणांमुळे देशाला प्रतिष्ठा प्राप्त होत असते. बहुसांस्कृतिकतावादी धोरणामुळे अनेक देशांना असणारा फुटीरतावादाचा, असंतोषाचा, यादवीचा आणि सामाजिक अस्थिरतेचा धोका कमी होईल. जोपर्यंत मानवी समाजात धर्म, वंश, जाती, भाषा, संस्कृती, रंग यांनी निकषावरून भेदाभेद अस्तित्वात आहेत तोपर्यंत बहुसांस्कृतिकतावादाचे धोरणच समाजाच्या व देशाच्या ऐक्याला उपयुक्त ठरू शकते.

**संदर्भ:**


1) चौसाळकर अशोक, आधुनिक राजकीय सिद्धांत, युनिक अँकॅडमी, पुणे, 2017.
2) बेन्नूर फक्रुद्दीन, हिंदुत्व, मुस्लिम आणि वास्तव, भूमी प्रकाशन, लातूर, 2007.
3) पळशीकर सुहास, जमातवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2006.
4) पांढरीपांडे सु. श्री., हिंदू स्वराज्य आणि नवे मन्वंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2010.
5) वाहूळ अरुण, भूमीच्या शोधात, रोहिंग्या मुस्लिम, लोटस इंडिया प्रकाशन, औरंगाबाद, 2011.
6) पवार प्रकाश, समकालीन राजकीय चळवळी, नवहिंदुत्व व जातसंघटना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2022.
7) दैनिक लोकसत्ता.
8) दैनिक सकाळ.